प्रकरण क्र. ५

# उपसंहार

# प्रकरण क्र. ५
# उपसंहार

महाराष्ट्रात गोंधळी, वाघ्यामुरळी, दशावतारी, दंडारी, भारूडी, बहुरूपी, पोतराज, पांगुळ, भराडी या लोककलांनी आणि लोककलावंतांनी एका बाजूला लोकधर्माचा जागर चालू ठेवला तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातील जनमानसाचे रंजन करून लोकरंगभूमीच्या विकासाच्या पाऊलखुणा निश्चित केल्या. या लोककलांना आविष्कृत होण्यासाठी आधुनिक रंगभूमीच्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्या तरी फारसे अडत नव्हते. या लोककला प्रकारातील काही अंश स्वीकारून 'तमाशा' या लोककला प्रकाराने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले. स्वत:चा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग सिद्ध केला. स्वत:च्या रंजनसामर्थ्याने संपूर्ण महाराष्ट्राला स्वत:कडे आकर्षित करून घेतले. या कलाप्रकाराचे रंजनसामर्थ्य आजही कमी झाल्याचे आढळून येत नाही. आजही ग्रामीण भागात जत्रेच्या निमित्ताने तमाशाचे आयोजन होतेच, किंबहुना 'जत्रेत तमाशा नसला तर जत्रा कसली?' अशी धारणा दिसून येते. आजही अगदी पहाटेपर्यंत रसिक प्रेक्षकांचे अवधान अबाधित ठेवण्यात तमाशा यशस्वी होत आहे.

या तमाशाचे रंजन सामर्थ्य व लोकप्रियता पाहून तमाशाच्या धर्तीवरच 'लोकनाट्ये' निर्माण झाली. या लोकनाट्यांचा उद्देश लोकांचे रंजनातून प्रबोधन करणे हा होता. या लोकनाट्यातून निव्वळ रंजनाच्या हेतूने 'वगनाट्ये' निर्माण झाली. त्यांनी तमाशा आणि नाटक यांच्यामधली जागा पटकावली आणि संपूर्ण महाराष्ट्राचे निखळ मनोरंजन केले. या अनेक वगनाट्यांमध्ये 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या दोन वगनाट्यांनी सर्वाधिक लोकप्रियता प्राप्त केली. म्हणून या वगनाट्यातील कथानकाचे वेगळेपण, व्यक्तिरेखा, रसनिर्मिती, भाषाशैली, परिणामकारकता, विनोद, या वगनाट्यांचे लोकरंगभूमीवरील स्थान, नाट्यकृतींच्या यशाचे गमक, नाट्यकृतीची प्रयोगक्षमता, कलाकार सापेक्षता, या वगनाट्यांनी लोकरंगभूमीसाठी दिलेले महत्वपूर्ण योगदान स्पष्ट करण्यासाठी या प्रबंधिकेची मांडणी केलेली आहे.

या प्रबंधिकेची मांडणी करत असताना पहिल्या प्रकरणामध्ये सुरूवातीला प्रास्ताविक लिहून विषयाचे महत्व आणि प्रबंधिकेचा हेतू स्पष्ट केलेला आहे. तसेच महाराष्ट्रात प्रचलीत असणाऱ्या गोंधळ, वाघ्यामुरळी, दशावतारी खेळ, दंडार, बहुरूपी खेळ, भेदिक-कलगीतुरा, वासुदेव यासारख्या लोककलांमध्ये तमाशाची पूर्वचिन्हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्या लोककलेकडून तमाशाने कोणते अंश स्वीकारले असावेत याचा शोध घेतला आहे. एकूण तमाशा सिद्ध झाल्यानंतर त्याची अंगे, प्रत्यंगे त्यामध्ये गण, गौळण, लावणी व लावणीचे प्रकार, दौलतज्यादा, रंगबाजी, छक्कड, मुजरा, फार्स किंवा बतावणी, संगीतबारी, वग स्पष्ट केलेली आहेत. तमाशा हा शब्द कोणत्या भाषेतून आला असावा याचा मागोवा घेतला आहे, आणि तमाशाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

त्यानंतर तमाशातून निर्माण झालेले लोकनाट्य, लोकनाट्याच्या निर्मितीचा हेतू लोकनाट्याचे गण, गौळण, बतावणी, वग याचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

लोकनाट्यातून रंजनाच्या हेतूने निर्माण झालेले वगनाट्य या वगनाट्यांची गण, गौळण, बतावणी, वग ही सर्व अंगे. या अंगांचे तमाशाच्या धर्तीवरील वेगळेपण वगनाट्याच्या कथेमध्ये बदलत्या काळानुसार आलेले नवनवीन विषय बदलते सामाजिक संदर्भ यांची चर्चा वसंत सबनीस, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे यांच्या प्रातिनिधीक वगनाट्यांच्या आधारे केली आहे. तसेच या वगनाट्यांनी नाटक आणि तमाशा या दोन्हीच्या प्रेक्षकवर्गाला एकत्र करून त्यांचे कशाप्रकारे रंजन केले आणि लोकरंगभूमीवर स्वत:चे स्वतंत्र स्थान कसे निर्माण केले याचा परामर्श घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणात हरिभाऊ वडगांवकर आणि दादू इंदुरीकर यांच्या व्यक्तित्वाचा आणि त्यांच्यामध्ये असणाऱ्या हरहुन्नरी कलावंताचा शोध घेऊन हरिभाऊ वडगांवकर यांच्या 'सावळा कुंभारं या वगाचे दादू इंदुरीकर यांनी 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामध्ये कशा प्रकारे रूपांतर केले याचा परामर्श घेऊन 'गाढवाचं लग्न' या नाट्यकृतीचा वाङ्मयीन आणि प्रायोगिक दृष्ट्या प्रेक्षक या नात्याने वेध घेतला आहे. या वगनाट्याच्या कथेचे बीज 'श्री नवनाथ

भक्तिसार' या ग्रंथातील २५ व्या अध्यायातील असून दादू इंदुरीकरांनी या कथेला वगनाट्याच्या साच्यात कशा प्रकारे बसवले हे स्पष्ट केले आहे. वगनाट्यातील गण, गौळणीचाही परामर्श घेतला आहे. प्रस्तुत वगनाट्यातील सावळा कुंभार, गंगी, बृहस्पती, चित्रसेन गंधर्व, दिवाणजी, राजा, राजकुमारी सत्यवती, इंद्र या सर्व व्यक्तिरेखांवर प्रकाश टाकून वगनाट्यातून आविष्कृत झालेले हास्य, अद्‌भूत, रौद्र, शृंगार, भय, करूण इ. रसांचा परामर्श घेतलेला आहे. या वगनाट्याची ओघवती, वेधक भाषाशैली, पद्यरचना आणि त्याद्वारे प्रेक्षकांवर होणारा परिणाम तसेच रंजक वगनाट्य असल्याने वगनाट्यामध्ये निर्माण होणारे विनोद आणि या वगनाट्यांचे लोकरंगभूमीवर असणारे स्वतंत्र आणि अढळस्थान या वगनाट्याचे रंजन सामर्थ्य यावर प्रकाश टाकलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात वसंत सबनीस यांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यावर प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये प्रथम वसंत सबनीस हे व्यक्ती म्हणून कसे होते? त्यांचे वाङ्‌मयीन जीवन, पंढरपूर, पुणे, कराड सारख्या ठिकाणी तेथील सामाजिक वातावरणातून आणि त्यांच्या वडिलांच्या तमाशाच्या छंदातून त्यांच्यावर झालेले वाङ्‌मयीन संस्कार. ते एकूण वगनाट्य लेखनाकडे कसे वळले हे चित्रित करून 'छपरी पलंगाचा वग' त्यांनी कसा लिहिला ती जन्मकथा सांगितली आहे. वगनाट्याचे वाङ्‌मयीन परीक्षण करत असताना वगनाट्याचे संविधानक किंवा कथावस्तू, बतावणी, वगाची लावणी, वगात असणाऱ्या हवालदार, शिपाई, मैनावती, कोतवाल, प्रधान, राजा, सख्या या सर्व व्यक्तिरेखांचा विस्ताराने विचार केलेला आहे. त्या व्यक्तिरेखांची वैशिष्टचे सांगून त्यांचे वगनाट्यातील स्थान व्यक्त केले आहे. वगनाट्यातून परिपुष्ट होणारे रस, वगनाट्याची ओघवती पण द्व्यर्थी संवादांनीयुक्त असणारी भाषाशैली, पद्यरचना आणि या सर्वांचा प्रेक्षकांवर होणारा परिणाम. वगनाट्यात असणारे विनोदाचे साम्राज्य आणि त्यातून व्यक्त होणारी विमुक्तता वगनाट्यातील संवादाच्या आधारे मांडलेली आहे. वरील सर्व गुणधर्मामुळे या वगनाट्याने लोकरंगभूमीवर निर्माण केलेले स्वतःचे स्वतंत्र असे स्थान, वगनाट्याची रंजनशीलता या वगनाट्याचे मराठी सोबतच गुजराथी,

हिंदी आणि इंग्रजी रंगभूमीवर झालेले प्रयोग या सर्व बाबींचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या दोन्ही वगनाट्यांच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा परामर्श घेतलेला आहे. या दोन्ही वगनाट्यांनी इतर कोणत्याही वगनाट्यांच्या तुलनेने अपूर्व यश संपादन केले. ते संपादन करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी दोन्ही वगनाट्यांना साह्यभूत ठरल्या. कोणत्या गोष्टींच्या आधारे दोन्ही वगनाट्यांना आपले यश अबाधित ठेवता आले. याचा शोध घेतलेला आहे. तसेच दोन्ही वगनाट्यांमध्ये असणारी प्रयोगक्षमता लोकरंगभूमीवर सादर झालेले प्रयोग, प्रयोग सादर करत असताना संवादातील लवचिकता आणि त्यामुळेच प्रत्येक प्रयोग रसिक प्रेक्षकाला कसा नवीन वाटतो तसेच प्रेक्षक उपरोक्त दोन्ही वगनाट्ये पुन्हा पुन्हा पाहण्यासाठी का जातात? याचे गूढ उकलण्याचा प्रयत्न केला आहे. लोकरंगभूमीवर लिखित संहितेपेक्षा ती संहिता रंगभूमीवर सादर करणाऱ्या कलावंताच्या अभिनयाला आणि हजरजबाबीपणाला अत्यंत महत्त्व देणारी ही दोन्ही वगनाट्ये सादर करणे हे एक आव्हानच होते. 'गाढवाचं लग्न' ज्या वगावरून निर्माण झाले तो 'सावळा कुंभार' हा वग स्वत: हरिभाऊ वडगावकरांच्या नंतर कुणालाच वठत नव्हता. ते आव्हान दादू इंदुरीकरांनी स्वीकारले व पेलले. 'विच्छा माझी पुरी करा' साठी सुद्धा शाहीर दादा कोंडके सारखा, हरहुन्नरी आणि हजरजबाबी कलावंत मिळाला. त्या दोघांनंतरही कुणी कुणी यातील भूमिका साकारल्या आणि त्यांना कशा स्वरूपाचे यश प्राप्त झाले याचा मागोवा घेतला आहे. या दोन्ही वगनाट्यांचा समावेश रंजक वगनाट्यांमध्ये होत असल्याने यामध्ये निखळ विनोद पाहावयास मिळतो. शाब्दिक कोट्यांच्या माध्यमातून निर्माण होणारा विनोद , दृश्य विनोद, श्राव्य विनोद, अर्थविपर्यासात्मक विनोद, प्रासंगिक हजरजबाबीपणातून निर्माण होणारा विनोद, स्त्री-पुरूष संबंधातून निर्माण होणार विनोद, प्रचलित परिस्थितीवर कोटी करून निर्माण होणारा विनोद अशा विनोदाच्या प्रकाराच्या अनुषंगाने वगनाट्यातील विनोदाचे परीक्षण केले आहे. आणि या दोन्ही वगनाट्यांनी

लोकरंगभूमीवर स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करून लोकरंगभूमीसाठी कोणते योगदान दिले. मराठी लोककलेला कशा प्रकारे उंचीवरचे स्थान प्राप्त करून दिले. तमाशाचा बाज राखून अश्लिलता विरहित पण शृंगारासहित वगनाट्य सादर करण्याचा आदर्श इतर वगनाट्यांसाठी कशा पद्धतीने घालून दिला. प्रेक्षकांमध्ये स्त्री प्रेक्षकांची संख्या वाढविण्यात कसे यश संपादिले याचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

म्हणूनच 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' ही वगनाट्ये अभ्यासाचा विषय म्हणून अत्यंत महत्वपूर्ण आहेत. या वगनाट्यांनी सर्वच स्तरामध्ये वगनाट्याला स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिले. अत्यंत पांढरपेशा प्रेक्षकांपासून सामान्य जनतेपर्यंत आणि शहरापासून खेड्यापर्यंत वगनाट्याचा स्वतंत्र प्रेक्षक निर्माण करून वगनाट्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. म्हणूनच मराठी लोकरंगभूमीवरील इतर सर्व वगनाट्यांच्या तुलनेत या दोन्ही वगनाट्यांना फार वरचे व अढळ स्थान प्राप्त झाले आहे.

या दोन्ही वगनाट्यांचा अभ्यास करून आढावा घेतला असता काही ठळक मुद्दे नजरेत भरतात ते पुढीलप्रमाणे -

१) गोंधळी, वाघ्यामुरळी, दशावतारी, भराडी, दंडारी इ. अनेक लोककलावंतांनी संपूर्ण महाराष्ट्रात एका बाजूला धार्मिकता जोपासली तर दुसऱ्या बाजूला लोकांचे मनोरंजन केले.

२) या अनेक लोककलांकडून काही तत्वे, काही अंश स्वीकारून तमाशा या लोककलेने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिध्द केले. उत्तर पेशवाईत तमाशाचा विशेष विकास झाला.

३) तमाशा या कलेला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अलौकिक व असाधारण लोकप्रियता प्राप्त झाली.

४) तमाशाने गणातून गौळणीतून, धार्मिकताही जोपासली आणि लोकांचे मनोरंजन केले.

५) सुरवातीला तमाशात गण, गौळण, लावणी, कलगी-तुऱ्याचे भेदिक हा पद्यमय भाग होता बतावणी आणि वगाचे कथानक तमाशात नंतर समाविष्ट झाले.

६) सुरवातीचे वगसुध्दा गद्यमय नसून पद्यमयच ऐकिव नावाच्या कथात्मक लावणीसारखेच असल्याचे आढळतात.

७) तमाशाच्या इतर अनेक अंगांपेक्षा गण, गौळण, लावणी, बतावणी आणि वग ही अंगे लोकप्रिय ठरली त्यामुळेच याच अंगांच्या माध्यमातून तमाशा आविष्कृत होताना आढळतो.

८) तमाशाचे रंजन सामर्थ्य विचारात घेऊनच तमाशातून लोकनाट्य निर्माण झाले. या लोकनाट्यांनी लोकप्रबोधनावर विशेष लक्ष केंद्रित केले. या लोकनाट्यातून केवळ मनोरंजनाच्या हेतूने वगनाट्य निर्माण झाले आणि त्यांने प्रचंड लोकप्रियता प्राप्त केली.

९) वगनाट्याने जरी पारंपारिक तमाशातील गण, गौळण, बतावणी, वग या गोष्टींचा स्वीकार केला असला तरी सादर केल्या जाणाऱ्या विषयांमध्ये मात्र आधुनिकतेचा स्पर्श झाल्याचे जाणवते. गौळण, बतावणी, वग यांच्या विषयांमध्ये लौकिक विषय आलेले आहेत.

१०) वगनाट्य या कलाप्रकाराने नाटक आणि तमाशा या दोन्हींच्या मधली जागा पटकावली आणि नाटक व तमाशा या दोन्हीचा प्रेक्षकवर्ग एकत्र करून स्वत:चा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग निर्माण केला.

११) 'सावळा कुंभार' या हरिभाऊ वडगांवकरांच्या वगाचे दादू इंदुरीकर यांनी 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात रूपांतर केले. 'श्री नवनाथ भक्तीसागर' ग्रंथातील २५ व्या अध्यायातील ही धार्मिक कथा लौकिकतेच्या पातळीवर आणली आणि लोकप्रिय केली.

१२) 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात सावळ्या कुंभाराने एका बाजूला आपली व्यथा मांडली. तर दुसऱ्या बाजूला खळखळून हसविले.

१३) लग्न समारंभ हा मुळातच माणसाच्या आवडीचा विषय पण 'गाढवाचं लग्न' हा मात्र कुतुहलाचा विषय ठरला आणि त्यामुळेच प्रेक्षक पैसे देऊन या लग्नाला येऊ लागले.

१४) 'गाढवाच्या लग्नाने' हसवत असतानाही अनेक प्रसंगातून नैतिकतेचा संदेश

दिला आणि माणसाने प्रामाणिकपणाने वागावे म्हणून अध्यात्मात असणारे शाप, उ:शापाचे भय माणसाच्या मनात कायम ठेवण्याचा प्रयत्न नकळतपणे केला.

१५) स्वत:च्या शब्दासाठी गाढवासोबत मुलीचे लग्न लावून देणारा राजा तर स्वत:च्या हट्टाची जबाबदारी स्वीकारून गाढवासोबत लग्न करणारी राजकुमारी दाखवून प्रामाणिकपणाचे उदाहरण समाजासमोर आणले.

१६) पौराणिक, लोककथात्मक आणि रजवाडी वगाचा समन्वय साधून जनमानसाचे रंजन केले. लोकरंगभूमीवर स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले.

१७) मराठी लोककलेचा २० नोव्हेंबर १९७३ रोजी 'नाटक अकादमी'तले 'पारंपरिक नाट्यकलेचे पारितोषिक' राष्ट्रपतींच्या हस्ते प्राप्त करून देऊन शासनदरबारी मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

१८) 'छपरी पलंगाचा वग' या नावाने 'वीणा' मासिकात प्रसिध्द झालेल्या आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने प्रायोगिक लोकरंगभूमीवर सादर झालेल्या वसंत सबनीस यांच्या या वगनाट्यानेही अपूर्व यश संपादन केले.

१९) 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने अस्सल मराठी लोकनाट्य तमाशात आमुलाग्र बदल घडवून आणले. आदर्श वगनाट्याची संकल्पना समस्त भारतभूमीला दाखवून दिली.

२०) महाराष्ट्राचे लोकनाट्य हे महाराष्ट्राप्रमाणेच सुसंस्कृत आणि बाणेदार असले पाहिजे त्यामध्ये अश्लिलतता नसावी पण निखळ शृंगार मात्र असावा असा आग्रह बतावणीतून धरला.

२१) वगनाट्य सादर होत असताना गौळणीचा भाग पूर्णपणे काढून जरी टाकला तरी बतावणीच्या जोरावर त्याची उणीव न भासू देण्याची किमया प्रस्तुत वगनाट्याने केली.

२२) समाजात बोकाळलेला भ्रष्टाचार आणि वशिलेबाजी प्रत्यक्ष रंगमंचावर सादर करून भ्रष्टाचारी आणि वशिलेबाजांना चिमटे काढण्यात हे वगनाट्य यशस्वी झाले.

२३) 'नाही कधी का तुम्हास म्हटले' 'झाडाला पिकलाय आंबा' 'सोडू नका तुम्ही धीर राजसा' अशा उत्कृष्ट लावण्या सादर केल्या की ज्यांची दखल भविष्यात निर्माण झालेल्या चित्रपटांनी घेतली आणि त्यांची लोकप्रियता आजही कमी झालेली नाही.

२४) या वगनाट्याने मराठी लोकरंगभूमीवर अपूर्व यश संपादन केलेच पण मराठी सोबत गुजराती, हिंदी, इंग्रजी रंगभूमीवरही आपले प्रयोग सादर केले आणि प्रचंड लोकप्रियता प्राप्त केली.

२५) एकाच कलाकार संचात ११८५ प्रयोग सादर करण्याचा उच्चांक (रेकॉर्ड) 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने करून दाखवला.

२६) प्रचलित परिस्थितीवर मार्मिक टिप्पणी करण्याची प्रथा 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने सुरू केली ती अत्यंत लोकप्रिय ठरली. इतर अनेक वगनाट्यांनी ती प्रथा उचलण्याचा प्रयत्न केला.

२७) 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या दोन्ही वगनाट्यांनी लोकरंगभूमीवर प्रचंड यश संपादन केले. नाटक आणि तमाशा या दोन्हींचा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग एकत्र आणण्यामध्ये या दोन्ही वगनाट्यांना यश आले.

२८) दोन्ही वगनाट्यांमधून अश्लिलता विरहित शृंगार सादर केला. शृंगार दाखवत असातना सुध्दा मर्यादा पाळण्याचे भान दोन्ही वगनाट्यांनी राखले म्हणूनच ही वगनाट्ये पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय असल्याचे दिसून येते.

२९) वगनाट्ये सादर करत असातना सावळा कुंभार असो किंवा हवालदार असो या दोन्ही व्यक्तिरेखांनी आपल्या संवादातून द्व्यर्थी शब्दांचा मोठ्या प्रमाणावर वापर केल्याचे दिसते.

३०) प्रचलित व्यवस्थेवर घटना प्रसंगांवर राजकीय परिस्थितीवर मार्मिक कोटी करून प्रेक्षकांना हसविण्याचे कार्य दोन्ही वगनाट्यांनी केले.

३१) अस्सल मराठी तमाशा असो, लोकनाट्य असो अथवा वगनाट्य असो

पांढरपेशा समाजाचा यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वग्रहदुषित होता. तो पुसून या समाजाला स्वत:कडे आकर्षित करून तमाशाला, लोकनाट्याला अथवा वगनाट्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य या दोन्ही वगनाट्यांनी केले.

३२) सावळा कुंभार आणि हवालदार या दोन्ही व्यक्तिरेखा सादर करणाऱ्या सर्व कलावंतांनी आपल्या हजरजबाबीपणातून संवाद साधून प्रेक्षकांना मनमुराद हसविले.

३३) ग्रामीण आणि शहरी भागातील प्रेक्षकांना या दोन्ही वगनाट्यांनी भुरळ घातली आणि ती कायम ठेवण्यात ही दोन्ही वगनाट्ये यशस्वी ठरली.

३४) 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामुळे दादू इंदुरीकरांसारखा तर 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यामुळे शाहीर दादा कोंडके सारखा सोंगाड्या महाराष्ट्राला मिळाला. दादा कोंडकेंनी आपल्या अभिनयाच्या जोरावर आपले सर्व चित्रपट 'गोल्डन ज्युबिली' केले.

३५) दोन्ही वगनाट्यांनी प्रेक्षकांना सतत हसत ठेऊन प्रेक्षकांच्या मनामध्ये कायमचे स्थान प्राप्त केले.

३६) लोककला किंवा लोकसाहित्य हे लोकविद्यापीठ आणि लोककलावंत हे लोकशिक्षक आहेत. या दोन्ही वगनाट्यांच्या माध्यमातून नीतीमत्तेची शिकवण देऊन संपूर्ण प्रेक्षकवर्गाला लोकशिक्षणच दिले, लोकांना शहाणे करून सोडण्याचा प्रयत्न केला.

३७) समाजातील अनिष्ट गोष्टींवर उपरोधपूर्ण विनोदाच्या माध्यमातून बोट ठेवले आणि अप्रत्यक्षपणे समाज प्रबोधनासच हातभार लावला. समाजामध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

३८) समाज मनाला सकारात्मक विचार करायला लावण्याची किमया या दोन्ही वगनाट्यांनी करून दाखविली.

३९) या वगनाट्यांनी मध्यमवर्गीय समाज नजरेसमोर ठेऊन प्रयोगांचे सादरीकरण केले. त्यांच्या मनातील द्वंद्व टिपण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि या समाजाच्या अभिरूचीला उतरण्यास ही दोन्ही वगनाट्ये यशस्वी ठरली.

समारोप -

मराठी लोकरंगभूमीवरून वर्षानुवर्षे सादर होत आलेली 'गाढवाचं लग्न' व 'विच्छा माझी पुरी करा' ही दोन्ही वगनाट्ये गेल्या तीन पिढ्यांचे प्रबोधन आणि रंजन करीत आली आहेत. आजच्या जागतिकीकरणाच्या संगणक युगातही त्यांची लोकप्रियता तसूभरही ओसरली नाही. 'पारंपरिक तमाशाचा' 'ऑर्केस्ट्रा' होत असतानासुध्दा ही दोन्ही वगनाट्ये आपल्या ठिकाणी अचल राहिली. लोकरंगभूमी आणि मराठी रंगभूमी यांची परंपरा अधिक समृध्द बनविली. तसेच नव्या रसिक प्रेक्षकांची मानसिकताही घडविली. वाङ्मयीनदृष्ट्या आणि प्रायोगिकदृष्ट्या दोन्ही कलाकृती तोडीस तोड अशा श्रेष्ठ दर्जाच्याच आहेत. संविधानक रसिकमान्य व्यक्तिरेखा प्रभावी रसनिष्पत्ती, कलाकारसापेक्ष हजरजबाबीपणाचे सादरीकरण आणि मराठी मनाला खळखळून हसविणारा विनोद लोकरंगभूमीवर बारमाही वाहणाऱ्या नदीप्रमाणे प्रवाहित होते आहे आणि रंजनाच्या अपेक्षेने वगनाट्य अनुभवावयास गेलेल्या हजारो रसिक प्रेक्षकांची तृष्णा भागवीत आहे.

या वगनाट्यांनी स्वत:च्या प्रयोगक्षमतेने अमराठी प्रेक्षकांचीही दाद मिळविली.'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य गुजराती, हिंदी, आणि इंग्रजी भाषेमध्ये भाषांतरित झाले म्हणजेच गाढवाचं लग्न, विच्छा सारख्या वगनाट्याने मराठी लोककला जागतिक पातळीवर नेऊन पोहोचविली म्हणून ही दोन्ही वगनाट्ये कलाकृती म्हणून श्रेष्ठ आहेत. मराठी लोकरंगभूमीला या दोन्ही कलाकृती ललामभूत ठरलेल्या आहेत यात शंका नाही.

******